# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

... महाराष्ट्र अधिनियम १९९४ ... कलम ३ च्या ... दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org


क्रमांक/महा.वि./गो.वि./१२८९/२०१७ दिनांक २७/०८/२०१७

## परिपत्रक

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य

सर्व संलग्नित महाविद्यालये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— वेतनावरिल खर्च नियंत्रित करणेबाबत

अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदे भरण्याकरिता नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित न करण्याबाबत

संदर्भ:—१)मा. सहसंचालक, नागपूर यांचे पत्र क्र. उशिनाग/पदमा/संकीर्ण/४३२८/२०१७ दि. १०/७/२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयाना मंजुर पदांना आढावा घेवून सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची दि. ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत अंतीम मुदतवाढ देण्यात आलेली आहे असे नमूद केले आहे. त्यामुळे २५ मे २०१७ नतंर या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेली नाहरकत प्रमाणपत्रे स्थगित करण्यात येत आहे. सदर नाहरकत प्रमाणपत्रे या कार्यालयास परत करण्यात येवून त्यावरिल कार्यवाही तात्काळ स्थगित करावी. यापुढे शासनाचे पुढील आदेश निर्गमित होईस्तोवर नाहरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात येवू नयेत, हयाची सर्वांनी नोंद घ्यावी तसेच २५ मे २०१७ पासून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनाचे पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे २५ मे नतंर करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांना स्थगिती देण्यात येत आहे. शासन निर्णयाची नोंद घेवून नविन नियुक्तीकरिता निवड समिती देण्याबाबतच्या कार्यवाहीस तुर्तास स्थगिती देण्यात येत आहे.

सदरहु पत्र आपल्या माहितीकरिता संलग्नित करण्यात आलेले आहे.

सहपत्र:— वरिलप्रमाणे

(डॉ. व्ही. सी. सिल्हारे)
प्र. उपकुलसचिव (म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१
**Website:www.dirhe.in/jdnagpur/**
Email: jdhengp@rediffmail.com
**Phone No.0712- 2561713**
Email: rjdng.dhepune@gov.in
**Fax No.0712- 2554210**

**अत्यंत महत्त्वाचे परिपत्रक/तातडीचे**

**ई-मेलव्दारा**

क्रमांक:उशिनाग/पदमा/संकिर्ण/४३२८/२०१७
दिनांक:- १० /७ /२०१७

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर

२. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यपीठे,
नागपूर विभाग, नागपूर

विषय- **वेतनावरील खर्च नियंत्रित करणेबाबत.**
**अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदे भरण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित न करण्याबाबत**

संदर्भ - १. मा. शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)म.रा.पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(७८/१७) अधी-३/विशि-१/७३१९, दिनांक २०/६/२०१७.
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र३०/२०१६/आ.पु.कक्ष दिनांक २५ मे २०१७
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.उशिनाग/पदमा/संकिर्ण/४१६१/२०१७, दिनांक ३/७/२०१७

उपरोक्त विषयाचे संदर्भिय संचालनालयाचे दिनांक २०/६/२०१७ चे पत्रान्वये प्राप्त शासन निर्णय (वित्त विभाग) चे अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयाचा मंजुर पदांचा आढावा घेवून सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची दिनांक ३१ ऑगस्ट,२०१७ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच जोपर्यंत आकृतीबंध मंजूर होत नाही, तोपर्यंत नविन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही, असे नमुद केले आहे. त्यामुळे २५ मे २०१७ नंतर या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेली नाहरकत प्रमाणपत्रे स्थगित करण्यात येत आहे. सदर नाहरकत प्रमाणपत्रे या कार्यालयास परत करण्यात येवून त्यावरील कार्यवाही तात्काळ स्थगित करावी. यापुढे शासनाचे पुढील आदेश निर्गमित होईस्तोवर नाहरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात येवू नयेत, हयाची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच २५ मे २०१७ पासून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनाचे पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे, सोबत संचालनालयाचे व शासन निर्णयाची प्रत जोडण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे, २५ मे नंतर करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांना स्थगिती देण्यात येत आहे. यासोबतच सर्व विद्यापीठांनी संदर्भांकित शासन निर्णयाची नोंद घेवून नविन नियुक्तीकरीता निवड समिती देण्याबाबतच्या कार्यवाहीस तूर्तास स्थिगिती द्यावी. तसेच, आपणाकडे सादर केलेल्या मान्यतेच्या प्रस्तावास देखील विद्यापीठ स्तरावरून स्थगिती देण्यात यावी, जेणेकरून शासन आदेशाची अवमानना होणार नाही.

**सहपत्रः- वरीलप्रमाणे**

A. M. Rahatgaonkar
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर